महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९३२ /२०२४ दि. १० /०८/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत MMRDA मार्फत मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. कंपनी कडून मुंबई मेट्रो लाईन–४ चे काम करण्यात येणार आहे. सदर मेट्रो ४ चे पिलरवर **नागलाबंदर सिग्नल ते इंडियन ऑईल पंप दरम्यान आय व यु गर्डर** टाकतेवेळी ठाणे घोडबंदर वाहिनी जड अवजड वाहनांकरीता वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** ठाणे घोडबंदर वाहिनीवरील गर्डरचे काम करताना घोडबंदरच्या दिशेने जाणा–या सर्व जड अवजड वाहनांना **पिलर नं. ८५ जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ठाणे वजनकाटा जवळून सर्व्हिस रोड मार्गे पुढे इंडियन ऑईल पंपसमोर मुख्य रस्त्याने इच्छित स्थळी जातील.

०१) दि. ११/०८/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १२/०८/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०२) दि. १३/०८/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १४/०८/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०३) दि. १५/०८/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १६/०८/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०४) दि. १६/०८/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १७/०८/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०५) दि. १८/०८/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १९/०८/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०६) दि. २०/०८/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २१/०८/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०७) दि. २२/०८/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २३/०८/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०८) दि. २४/०८/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २५/०८/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०९) दि. २६/०८/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २७/०८/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
१०) दि. २८/०८/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २९/०८/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
११) दि. २९/०८/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. ३०/०८/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
१२) दि. ३१/०८/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. ०१/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत

सदर वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान **आय व यु गर्डर** टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर,</u>**

**मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर**
**मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर**
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**<u>प्रत</u>** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.